

आई बरखा बहार...
लम्हेंत श्रीदेवी आणि युगांधरमध्ये संगीता बिजलानी

चित्रपटांतील शास्त्रीय वर्षागीतं

ज्यात न्हाऊन

वर्षागीतं ही काही चित्रपट संगीतातली नव्याने चर्चा करण्यासारखी बाब नाही. पण आज आपण चर्चा करणार आहोत ती शास्त्रीय संगीतावर आधारित वर्षागीतांची...

□ अजित पोपट

लोकप्रिय शायर झवेरीचंद मेघाणी यांचं एक प्रसिद्ध गीत 'मारु मन मोर बनी थनगाट करे...' मोर केव्हा थरारून नाचतो?

आकाशात विजा कडाडू लागल्या, ढगांचा गडगडाट सुरू झाला की मोर आपला पिसारा फुलवून आनंदाने थरारू लागतो. अशोककुमार, एस. डी. बर्मन, महंमद रफी किंवा शैलेंद्र यांपैकी आज कोणीही आपल्यामध्ये नाही. पण त्यांच्या गीतांचा खजिना आपल्याकडे आहे.

तिग दा धीगी धीगी
बदरा धिर आये
रूत है भीगी भीगी... नाचे...

शास्त्रीय संगीताच्या जाणकारांना आणि चित्रपट संगीत चाहत्यांना आवडत्या भैरवी रागिणीत हे गीत आहे. यात मृदुंगाची साथ आहे. सोप्या भाषेत वर्षा ऋतूचं वर्णन आणि तबल्याच्या ठेक्यावर नृत्याचा ठेका आहे.

दुसरा एखादा कलाकार क्वचित तयार होईल अशी भयानक चेहरा असलेल्या तरुणाची 'नॉनग्लॅमरस भूमिका यात अशोककुमारने साकारली आहे. चित्रपटाचं नाव आहे *मेरी सुरत तेरी आँखें*. यात देखण्या आई-वडिलांच्या



निघावं...

पोटी एका कुरूप मुलाचा जन्म होतो. पुढे वडील त्याचा त्याग करतात.

अनेक वर्षांनी देखण्या मुलाची (प्रदीप कुमार) प्रेयसी जंगलात राहणाऱ्या या कुरूप मुलाच्या आवाजाने मोहून जाते असं त्याचं कथानक होतं. दादामुनी मनमोकळ्या स्वभावाचे होते. 'जी' ला दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी सांगितलं, 'नाचे मन मोरा...मला गायचं होतं. मला संगीतातली जाण आहे आणि मी गातो हे वारंवार सांगूनही बर्मन साहेबांनी माझं काही एक ऐकून घेतलं नाही.' असं म्हणून दादामुनी खळखळून हसू लागले. यावर बर्मनदांनी काय उत्तर दिलं माहीत आहे? ते म्हणाले, 'तुझा गेटअप बघ किती भयानक आहे. त्यात तुझा आवाज ऐकला तर नायिका घाबरून पळून नाही का जाणार?' आणि असं मला सांगण्याचं धाडस फक्त सचिनदाच करू शकतात,' दादामुनींनी सांगितलं.

आपण वर्षागीतांबद्दल बोलतोय. वर्षभर निसर्गावर जमलेला मळ ज्यामुळे धुतला जातो त्या पावसाला संस्कृत भाषेत मल्हार असं म्हणतात. गेल्या पाच-सहा दशकात हिंदी चित्रपटांत पावसावर तीस-पस्तीस गीतं बनली असतील. त्यातली बरीचशी गीतं शास्त्रीय संगीतावरची असतील. आपल्या संगीतात मल्हार रागाचेही काही प्रकार आहेत. तानसेन गात असत तो मियां मल्हार, मीराबाईचा मीरा मल्हार, रामदासी मल्हार, मेघमल्हार, गौड मल्हार, सूर मल्हार वगैरे वगैरे. नाचे मन मोरा मगन...भैरवी रागात आहे.

सुरुवातीला आपण भैरवी रागात बनलेल्या शास्त्रीय संगीतावर आधारित वर्षागीतांचा विचार करू या. भारतीय लोकसाहित्यात पाऊस आणि विरहाने होरपळणारी नायिका यांच्यात एक अतूट नातं असावं. चातुर्मासात स्त्रियांना प्रियकराचा विरह विशेष जाणवतो. म्हणूनच या प्रियतमा आपल्या प्रियकराच्या विरहाचा ठपका पावसावर ठेवतात. असंच एक गीत *सांज और सवेरा*मध्ये (१९६४) शंकर-जयकिशनच्या संगीतात आहे. तेही भैरवी रागात आहे. सुमन कल्याणपूर आणि महंमद रफी यांच्या आवाजातल्या या गीताचे बोल आहेत...

अजहुं न आये बालमा
सावन बीता जाये...

हे गीत गोविंदाची आई निर्मलादेवी आणि लक्ष्मी शंकरने गायलेल्या 'सजनवा सावन बीता जाय...' ठुमरीवर बेतलेलं आहे. हे गीत शास्त्रीय संगीताच्या चाहत्यांना एखाद्या पक्वान्नासारखं मधुर वाटतं. पण पुढची गंमत अशी की इतकं भावनाप्रधान गीत कॉमेडियन जोडी मेहमूद आणि शुभा खोटे यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं.

हृषिकेश मुखर्जींच्या मनातून हे गीत मीनाकुमारी आणि गुरू दत्त यांच्यावर चित्रित करायचं होतं. गुरू दत्तही दादामुनींप्रमाणे संगीताचे जाणकार होते. पण का कोण जाणे आपण या गीताला न्याय देऊ शकणार नाही, असं गुरू दत्तनी हृषीदांना पटवलं. मीनाकुमारीला त्याचं फार वाईट वाटलं होतं. पण इतकं चांगलं गीत फुकट घालवायला हृषीदा तयार नव्हते. म्हणून कथानकात थोडा फेरफार करून त्यांनी हे गीत शुभा खोटे-मेहमूदवर चित्रित केलं.

काय हा विरोधाभास. *मेरी सुरत तेरी आँखें*मध्ये नायक गीत स्वतः गायला उत्सुक होता तर इथे नायकाने गायची तर जाऊच द्या, गीत स्वतःवर चित्रीत करण्याचीही तयारी दाखवली नाही.

आपण वर्षाऋतूत प्रियकराच्या विरहात जळणाऱ्या नायिकांचा विचार करतोय. या अर्थाचं एक अतिशय सुंदर गीत राजेश रोशनने १९६० मध्ये दिलं. साहिर लुधियानवींचं हे गीत राजेश रोशनने राग मेघमध्ये सादर केलं. त्याचे बोल होते -

गरजत बरसत सावन आयो रे
लायो न संगमें हमरे बिछडे बलमवा
सखी का करूं हाय... गरजत बरसत...

गडगडाट करत पाऊस आला खरा पण माझ्या लाडक्याला काही त्याने आपल्यासोबत आणलं नाही अशी तक्रार इथे नायिका करतेय. या मुखड्यानंतरचे बोलही छान आहेत.

रिमझिम रिमझिम मेघा बरसे
तडपे जियरवा मीन समान
पड गई फिकी लाल चुनरिया
पिया नहीं आये... गरजत बरसत...
पल पल छिन छिन पवन झकोरे
लागे तन पर तीर समान
नैन न जल सों गीली कजरिया
अगन लगाये... गरजत...

काही वर्षांनी असाच प्रयोग लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी *बरखा बहार* (१९७३) मध्ये केला होता. रेखा-नवीन निश्चलचा हा चित्रपट फारसा चालला नाही. पण त्यातलं एक गीत चारुकेशी रागात लक्ष्मीकांत-प्यारेलालच्या संगीतातलं होतं ते लक्षात राहणारं होतं.

छम छम छम छम रूत बरसे
रूत बरसे जियरा तरसे
सजनी अकेली करे हैं पुकार
आयी बरखा बहार...

अमिताभ अँग्री यंग मॅन किंवा सुपरस्टार बनण्याच्या आधीची ही गोष्ट आहे. जयाचा पहिला चित्रपट *गुड्डी*मधलं एक गीत वसंत देसाईंनी मियां मल्हार रागात बसवलं होतं. गीताचे बोल अतिशय सुंदर आहेत.

बोले रे पपीहरा पपीहरा
इक घन बरसे
इक मन प्यासा
इक मन तरसे रे...

संगीतकाराने या गीतात वादळी वाऱ्यांची गर्जना, बेडकाचं डराव डराव वगैरे ध्वनींचा वापर कल्पकतेने केलेला आढळतो. हे गीत वाणी जयरामच्या आवाजात होतं. तुम्ही ते लता किंवा आशाकडून का नाही गाऊन घेतलंत



सुनयनामध्ये रामेश्वरी

या प्रश्नाच्या उत्तरादाखल संगीतकार वसंत देसाईंनी नुसतं स्मित केलं होतं. पण वाणी जयरामने गीताला दिलेला न्याय पाहता त्यांची निवड अचूक होती हे आपल्याला मान्य करावंच लागेल.

वसंत देसाईंचीच आणखी एक रचना इथे लक्षात घ्यायला हवी. *रामराज्य* नावाचे दोन चित्रपट येऊन गेले. एक १९४३ मध्ये विजय भट्ट आणि शंकर भट्ट यांचा होता तर दुसरा १९६७मध्ये विजय भट्ट्याच दिग्दर्शनातला बिना रॉय, कुमार सेन अभिनित होता. पहिला कृष्णधवल होता. महात्मा गांधींनी आपल्या उभ्या आयुष्यात दोनच चित्रपट पाहिले होते. एक *सत्यवादी हरिश्चंद्र* आणि दुसरा विजय भट्टचा पहिला *रामराज्य*. दुसरा *रामराज्य* रंगीत होता. त्यातलं एक गीत लताच्या आवाजातलं आणि वसंत देसाईंच्या संगीताने नटलेलं होतं. गीताची सुरुवात 'डर लागे...' अशी होती. आणि त्यापाठोपाठ विजेचा कडकडाट कानावर येऊन पुढचं गीत सुरू होतं

'डर लागे चमके बिजुरिया
सावन की रूत कजराळी कारी...' हे गीत रामदासी मल्हार रागात आहे.

महाकवी कालिदास यांनी मेघदूत महाकाव्यात अशी कल्पना केली होती की विरहाने पोळणारी नायिका व ढगाबरोबर आपल्या प्रियकरासाठी प्रेमाचा संदेश पाठवते. तुम्ही कुठे आहात? या पावसाळी रात्री तुमचा विरह मला असह्य होतोय... अशा अर्थाचे बोल होते. याच कल्पनेचा आधार घेऊन *सुनयना* चित्रपटात रवींद्र जैन यांनी राग मेघमल्हारमध्ये एका गीताची रचना केली होती

मेघा रे ओ मेघा
तु तो जाये देश-विदेश
क्युं न लाये
उनके आवन का संदेश...

योगायोग असा की या चित्रपटात आंधळ्या नायिकेची भूमिका साकारणाऱ्या रामेश्वरीला याच चित्रपटाच्या सेटवर एक अपघात झाला आणि तिच्या एका डोळ्याला गंभीर दुखापत झाली होती.

रवींद्र जैन यांच्या याच कल्पनेशी मिळती जुळती कल्पना *बहाना* (१९६०) मध्ये आढळते. शास्त्रीय संगीताचे सच्चे उपासक मदन मोहन यांनी लताच्या आवाजात हे गीत सुंदर खुलवलं-

जा रे बदरा बेरी जा
पिया का संदेशवा ला रे...

यात अनेक रागांची सरमिसळ आढळत असली तरी मुख्य कल्पना विरहिणीचीच होती. असाच प्रयोग एस. डी. बर्मननी *शर्मिली* (१९७१) त केला होता. लताच्याच आवाजातलं हे गीत आजही लोकांच्या ओठी आहे-

मेघा छाये आधी रात
बैरन बन गई निंदिया
बता दे मैं का करूं...

हे गीत मल्हार रागाच्या कोणत्याही प्रकारातलं नाही. तरीही ते संगीत रसिकांच्या आवडीच्या गीतांत जाऊन बसलं.

अशी अनेक वर्षागीतं असतील. तुमच्या पसंतीचीही अनेक गीतं इथे अनुल्लेखित राहिली असतील. जाता जाता काही गीतांचा ओझरता उल्लेख. उदा. 'जिंदगीभर नही भूलेगी वो...' (*बरसात की रात*, राग यमन), 'बरसात में हम से मिले तुम सजन...' (*बरसात*, राग भैरवी) वगैरे. पण त्यांचा विचार आजवर अनेकदा झालाय. म्हणूनच बाहेर मुसळधार पाऊस पडत असताना खास ऐकावीत अशा शास्त्रीय संगीतावर आधारित काही जुन्या गीतांचा विचार आपण इथे केलाय.